द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् अँन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : (AIOCD)
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भः एमएसपीसी/एमएससीडीए/२६६ /२०२२ — १८ एप्रिल २०२२

**मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी /झोनल अध्यक्ष / सचिव**
**जिल्हा अध्यक्ष / सचिव**
महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँन्ड ड्रगिस्ट असोसिएशन

विषय : महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सील - निवडणुकीबाबत
संदर्भ : पत्र क्र. १.एमएसपीसी/एमएससीडीए/२०५/२०२२, दि. २७ जानेवारी २०२२
२. एमएसपीसी/एमएससीडीए/२१६/२०२२, दि. २२ फेब्रुवारी २०२२
३. एमएससीडीए/२५८ /२०२२, दि.४ एप्रिल २०२२

महोदय,

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेची निवडणुक प्रक्रिया सुरु झाली असून आपल्या पैकी बहुतांश जिल्हाने प्रत्यक्ष कामास सुरुवातही केलेली आहे.

राज्यसंघटनेने आपणास वरील संदर्भीय पत्राद्वारे वेळोवेळी केलेल्या सुचनांचे पालन झाल्याचे दिसून येत नाही. सदरहू बाब ही अतिशय गंभीर आहे. राज्यसंघटना आपल्यापरीने सर्व कामे युध्द पातळीवर जबाबदारीने करत आहे. आपण ही स्थानिक पातळीवर सहज होऊ शकणारी कामे प्रभावीपणे व जबाबदारीने कराल याची अपेक्षा आहे.

- ⇨ आपण आपल्या जिल्ह्यातील बहुतांश फार्मसी कॉलेजेस यांना प्रत्यक्ष भेट देण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्यक्षात त्या त्या फार्मसी कॉलेजमध्ये किती फार्मासिस्ट (प्रिन्सिपल/प्रोफेसर/टिचिंग स्टॉफ) आहेत त्यांची नावे, रजिस्ट्रेशन क्रमांक व मोबाईल नंबर आपणाकडे असणे अत्यंत आवश्यक आहे. सदरहू माहिती प्राप्त केली नसल्यास ती लवकरात लवकर प्राप्त करुन घ्यावी.
- ⇨ फार्मसी कॉलेजेसचे प्रिन्सिपल यांचे नाव व कॉलेजचा पत्ता ही माहिती **त्वरित** राज्यसंघटनेकडे पाठवावी. जेणेकरुन राज्यसंघटनेसही त्यांच्याशी संपर्क साधता येईल.
- ⇨ आपण फार्मसी कॉलेजेसना प्राधान्य देत असताना आपल्या जिल्ह्यातील सिव्हिल हॉस्पिटलस्, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामीण क्षेत्रातील रुग्णालये आणि अन्य हॉस्पिटलस् येथे कार्यरत फार्मासिस्ट यांची ही माहिती प्राप्त करुन घ्यावी व त्याठिकाणी प्रत्यक्ष भेटी द्याव्यात. त्यांची नावे, रजिस्ट्रेशन क्रमांक व मोबाईल नंबर ही माहिती प्राप्त करुन घ्यावी.
- ⇨ MSMRA च्या जिल्हा / स्थानिक पदाधिकारी यांच्या संपर्कात राहून,सभा घेऊन त्यांचेकडून फार्मसी शिक्षण घेतलेल्या सभासदांची यादी प्राप्त करण्याचा प्रयत्न करावा; तसेच होलसेलर बांधवांचे ही यामध्य सहकार्य घ्यावे.
- ⇨ आपल्याकडे कुरिअरद्वारे मोठे व छोटे असे पोस्टर्स पाठविण्यात आले आहेत. त्यापैकी मोठे पोस्टर्स सर्व होलसेलर्सच्या दुकानांत सर्वांना दिसेल अशा ठिकाणी चिकटवावे. तसेच प्रमुख रिटेलर्सच्या दुकानात ही दर्शनी भागात लावावे. या कामास गती द्यावी.
- ⇨ जिल्हा, शहर, तालुका स्तरावरील कमिटीची निर्मिती केली असेल असे गृहीत धरुन ठरविलेल्या कामास गती देण्यात यावी.

वरील नमुद संदर्भीय पत्रामधील आवश्यक ती सर्व कार्यवाहीची पुर्तता करुन राज्यसंघटनेकडे तसा अहवाल पाठविण्यात यावा. वरील बाबतीत आमच्याकडून कुठल्याही सहकार्याची अपेक्षा अथवा गरज असल्यास राज्य संघटनेचे सचिव - श्री. अनिल नावंदर यांच्याशी संपर्क साधावा.

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

अनिल नावंदर
**सचिव**

द महाराष्ट्र
स्टेट केमिस्ट्स् अॅन्ड
ड्रगिस्ट्स् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : (AIOCD)
All India Organisation of Chemists & Drugists.

२७ जानेवारी २०२२

संदर्भः एमएसपीसी/एमएससीडीए/२०५/२०२२

**मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी**
**सर्व झोनल अध्यक्ष / सचिव, सर्व जिल्हा अध्यक्ष / सचिव**
**महाराष्ट्र राज्य केमिस्ट अॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**विषय : महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निवडणुकीच्या नियोजनाबाबत**

महोदय,

आपणास माहितच आहे की, महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सीलच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झालेली असुन या निवडणुकीत एमएससीडिएच्यावतीने सहा उमेदवारांचे पॅनेल उभे करण्यात येणार आहेत. आपणास सहा ही उमेदवारांना निवडून कौन्सील मध्ये पाठवायचे आहे.

त्याअनुषंगाने आपणास खालील बाबी लक्ष देऊन करावयाच्या आहेत.

१. जिल्ह्याकडे प्राप्त झालेल्या मतदार यादीची तालुका निहाय विभागणीबाबत तपासणी करुन घेणे.

२. प्रत्येक तालुक्यात त्या त्या तालुक्याची मतदार यादी २ प्रतीत पाठविणे.

३. जिल्हा, शहर व तालुका निहाय कमिटीची स्थापना करणे.

४. केमिस्ट व्यतिरिक्त इतर क्षेत्रातील फार्मासिस्टशी संपर्क साधून त्यांची स्वतंत्र यादी तयार करणे.

५. अशा मतदारांशी संपर्क साधून आपल्या पॅनलला मतदान करवून घेण्याची जबाबदारी तालुक्यातील केमिस्ट बांधवामध्ये आपआपसात वाटून देणे.

६. प्रत्येक तालुक्याकडून त्यांच्या तालुक्यातील किती फार्मासिसूट बांधवांशी संपर्क होऊ शकतो व किती फार्मासिस्टची ओळख पटू शकली नाही त्याची स्वतंत्र यादी तयार करुन त्वरित राज्य संघटनेच्या कार्यालयाकडे पाठविणे.

७. झोन पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यांशी नियमित संपर्कात राहुन त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे, त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे, आपल्या झोनमधील सर्व जिल्हांच्या केलेल्या कार्याचा अहवाल नियमितपणे राज्यसंघटनेकडे पाठविणे.

८. आपल्या जिल्ह्यातील वैद्यकीय प्रतिनिधी (Medical Representative) यांच्या संघटनांशी व त्यातील नोंदणीकृत फार्मासीस्ट असणाऱ्या प्रत्येकाशी वैयक्तिक संपर्क साधावा व आपल्या पॅनलविषयी व्यवस्थित माहिती द्यावी.

९. वैद्यकीय प्रतिनिधी तसेच शैक्षणिक क्षेत्रात व हॉस्पिटल फार्मसी व उत्पादन क्षेत्रात व या व्यतिरिक्त माहिती असलेल्या नोंदणीकृत फार्मासीस्ट यांच्याशी संपर्कात राहून त्यांना निवडणुकीविषयी व आपल्या पॅनल विषयी व्यवस्थित माहिती द्यावी.

१०. महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निवडणुकीसंदर्भात **सोशल मिडियावर** कोणतीही पोस्ट राज्य संघटनेला पुर्व सुचना देऊन व मान्यता घेतल्याशिवाय टाकण्यात येऊ नये याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

P.T.O.

द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION

SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA

OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : (AIOCD)
All India Organisation of Chemists & Drugists.

११. खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे आपल्या जिल्हयातील (आपणास दिलेल्या यादीतील) नोंदणीकृत

| अ.क्र. | जिल्ह्यातील एकुण नोंदणीकृत फार्मासिस्ट | औषध विक्रेते | वैद्यकीय प्रतिनिधी | शासकीय/खाजगी रुग्णालयात काम करणारे | शैक्षणिक क्षेत्रात क्षेत्रात काम करणारे | उत्पादन क्षेत्रात काम करणारे | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तालुक्याचे नाव | | | | | | | |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |

१२. मतदारयादी आपल्या शहर अथवा तालुक्यातील नोंदणीकृत फार्मासिस्टचे नाव यादीत आढळत नसल्यास त्याची नोंद घ्यावी व त्याचे नाव अन्य जिल्ह्यातील यादीत असल्याची शक्यता असल्यास संबंधीत जिल्ह्याशी अथवा झोनचे पदाधिकारी यांच्याशी संपर्क करावा.

झोनचे सर्व पदाधिकारी व मुख्यतः प्रत्येक झोनचे अध्यक्ष , सचिव व संघटन सचिव हे त्या त्या झोनसाठी निवडणुकी संबधित कामकाज सांभाळण्याच्या दृष्टिने त्या त्या झोनचे प्रमुख म्हणून कामकाज पाहतील.

वरील प्रमाणे कार्याच्या दृष्टिने त्वरित तयारीस लागावे. वरील बाबतीत आमच्याकडून कुठल्याही सहकार्याची अपेक्षा अथवा गरज असल्यास राज्य संघटनेचे सचिव - श्री. अनिल नावंदर यांच्याशी संपर्क साधावा.

कळावे.

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

अनिल नावंदर
**सचिव**

द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् अॅन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ: एमएसपीसी/एमएससीडीए/२१६/२०२२ २२ फेब्रुवारी २०२२

मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी /झोनल अध्यक्ष / सचिव
जिल्हा अध्यक्ष / सचिव
महाराष्ट्र राज्य केमिस्ट अॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशन

विषय : महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सील - निवडणुकीबाबत

महोदय,

आपणास माहितच आहे की, महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सीलच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झालेली असुन या निवडणुकीत एमएससीडिएच्या वतीने सहा उमेदवारांचे पॅनेल उभे करण्यात आले आहे. दि. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी नवी मुंबई येथे झालेल्या पदाधिकारी सभेमध्ये झोन पदाधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सील निवडणुकीच्या मतदार यादीची सी.डी देण्यात आलेली आहे. यापत्रासोबत सर्व जिल्हा संघटनांना मतदार यादीची सी.डी देण्यात येत आहे.

आपण आप आपल्या विभागातील जास्तीत जास्त नोंदणीकृत फार्मासिस्टची यादी तालुका व जिल्हा पातळीवर व्यवस्थितपणे संगणक तज्ञ व्यक्तीच्या सहाय्याने तयार करुन घेण्याचे दृष्टिने आवश्यक ती कार्यवाही त्वरित सुरु करावी. आपण सदरहू बाबतीत आपले काम सुरु केले नसल्यास हा विषय अतिशय गंभीरतेने घेऊन याबाबत त्वरित कार्यवाही करावी. झोन अध्यक्ष / सचिव यांनी आपल्या विभागातील सर्व जिल्हा संघटनाशी संपर्क साधून कार्यास तीव्र गती द्यावी.

यासाठी आपणाकडे उपलब्ध असलेली माहिती तसेच महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या वतीने जारी करण्यात आलेली मतदार यादीची सी.डी याचा आधार घेऊन आपण शक्य तितक्या लवकर (Excel Format) मध्ये खालील नमुद केलेल्या तक्त्याप्रमाणे तयार करुन घ्यावी.

| Sr. No. | Electrol No | Registration No. | Pharmacist Name & Address | Tel /Mb No. | Email id. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

आपणास राज्यसंघटनेच्यावतीने संदर्भ :एमएसपीसी/एमएससीडीए/२०५/२०२२, दि. २७ जानेवारी २०२२ रोजी पाठविलेल्या पत्रानुसार निवडणुकीच्या नियोजनाबाबत करावयाची कामे व घ्यावयाची दक्षता याबाबत विस्तृत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने त्वरित जिल्हा, तालुका व शहर पातळीवर समित्या तयार करुन पत्रातील मुद्दाप्रमाणे कार्यास गती द्यावी. (पत्राची प्रत आपल्या माहितीस्तव सोबत जोडत आहोत)

जिल्हा संघटनेने केलेल्या कार्याचा अहवाल दर शनिवारी आपल्या झोनचे अध्यक्ष / सचिव यांच्याकडे पाठविण्यात यावा व झोनचे पदाधिकारी यांनी दर सोमवारी आपल्या झोनमधील जिल्ह्यांकडून प्राप्त कार्याचा अहवाल राज्य संघटनेच्या कार्यालयाकडे पाठवावा.

या पत्रासोबत देण्यात आलेली मतदार यादीची सी.डी **पासवर्ड प्रोटेक्टेड** असुन स्वतंत्र पत्राद्वारे सी.डी चा पासवर्ड देण्यात आलेला आहे. त्याचा वापर करुनच सी.डी मधून मतदार याची प्राप्त होऊ शकेल याची नोंद घ्यावी.

आपणाकडून त्वरित कार्यवाहीची अपेक्षा !

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट अॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**अनिल नावंदर**
सचिव

द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् ॲन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION
SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA
OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भः एमएससीडीए/२५८ /२०२२ — ४ एप्रिल २०२२

**मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी /झोनल अध्यक्ष / सचिव**
**जिल्हा अध्यक्ष / सचिव**
**महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**विषय : महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सील - निवडणुकीबाबत**
**संदर्भ : पत्र क्र - एमएसपीसी/एमएससीडीए/२०५/२०२२, दि. २७ जानेवारी २०२२**
**एमएसपीसी/एमएससीडीए/२१६/२०२२, दि. २२ फेब्रुवारी २०२२**

महोदय,

आपण महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या निवडणुक प्रचारासाठी कार्य सुरु केले असून त्यात आपण विविध कॉलेजेसला भेट देत आहात. त्यांच्याकडून ही उत्स्फूर्तपणे एमएससीडीए पॅनेलला पाठिंबा मिळत आहे व तसे पत्र ही दिले जात आहे. ही अतिशय उत्तम कामगिरी आहे.

आपणास सुचविण्यात येते की, संदर्भित कॉलेजेस मधील प्राचार्य/प्राध्यापक/ इतर स्टॉफ जो रजि. फार्मासिस्ट असेल त्यांची यादी त्यांचे नाव, मोबाईल नं, इमेल आयडी , रजिस्ट्रेशन नंबरसहित कॉलेजेसकडून प्राप्त करुन घ्यावेत. सदरहू कॉलेजेसमधील त्यांच्या माजी विद्यार्थ्यांची यादी (Alumni) की ज्या मध्ये फार्मासिस्टचे नाव, पत्ता व फोन नंबर / इमेल आयडी नमुंद असेल ती यादी प्राप्त करण्यासाठी कॉलेजेसना विनंती करुन अशा यादीची प्रत घेऊन ती Excel Format मध्ये तयार करुन राज्यसंघटनेच्या कार्यालयाकडे त्वरित पाठवून द्यावी.

यापुर्वी वरील नमुद संदर्भीय पत्रानुसार कळविल्याप्रमाणे जिल्हा, तालुका व शहरामधील सर्व स्तरातील नोंदणीकृत फार्मासिस्टची आपण नोंद केली असणार याची खात्रीआहे. तरी जिल्हा संघटनेने याकामी केलेल्या कार्याचा अहवाल झोन अध्यक्ष / सचिव यांच्याकडे पाठविण्यात यावा व झोनच्या पदाधिकाऱ्यांनी ती दर सोमवारी संघटनेच्या कार्यालयाकडे पाठविण्याचे ठरले आहे. याकडे लक्ष देऊन कार्यवाही करावी. आपणाकडे आज मिती पर्यंत तयार असलेल्या याद्या राज्य संघटनेच्या कार्यालयाकडे त्वरित पाठवून द्याव्यात.

वरील बाब गांभीर्याने घेऊन त्वरित अमंलबजावणी करुन तसा अहवाल राज्य संघटनेकडे पाठवावा हि विनंती.

धन्यवाद !

आपले नम्र
**दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

**अनिल नावंदर**
**सचिव**